MHAH230007372014

**राजेंद्र उमाजी शिंदे व इतर**
**विरुध्द**
**बाळु रंगू कोळेकर व इतर**

<u>**नियमीत दिवाणी दावा क्र. २१३/२०१० मधील निशाणी क्र. ७८ खालील आदेश**</u>

१. वादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, वादीने प्रतिवादी विरुध्द सदरचा अर्ज निरंतरच्या ताकीदीच्या मनाई हुकूमासाठी व मिळकतीचे गटांतर्गत मोजणी करुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. १ बाळु रंगू कोळकर हे दि. २७.०२.२०२० रोजी मयत झालेले आहे. त्यानंतर बाळु रंगू कोळकर यांच्या वारसांचा फेर क्र. ७४४ झाला. बाळु रंगू कोळकर यांच्या वारसांनी सदर मिळकत त्रयस्त ईसम नामे गोरख नामदेव म्हस्के, रा. चांदगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर यांना ०३.०२.२०२३ रोजी खरेदी दस्त क्र. ७९३/२०२३ अन्वये विक्री केलेली आहे व त्याचा फेरफार क्र. ८२५ असा आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ यांच्या नावासमोर मयत लिहुन प्रतिवादी क्र. १ ब म्हणुन गोरख नामदेव म्हस्के, रा. चांदगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर यांना दाव्यात प्रतिवादीपणात सामील करणे आवश्यक आहे.

३. वादी यांचे पुढे असे कथन की, प्रतिवादी क्र. २ प्रभा रंगू कोळेकर यांनी त्यांच्या नावे असलेली संपूर्ण मिळकत फेरफार क्र. ८२६ अन्वये श्रीकांत मच्छींद्र पवार, रा. विठ्ठलवाडी, चांदगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर यांना खरेदी दस्त क्र. ७९४/२०२३ व दि. ०३.०२.२०२३ रोजी विक्री केलेली आहे. त्यामुळे त्यांना प्रतिवादी क्र. २ ब म्हणुन सामील करणे आवश्यक झालेले आहे.

४. वादी यांचे पुढे असे कथन की, सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे. त्यामुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही त्यामुळे वादींचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

५. सदर अर्जावर प्रतिवादी क्र. ६, ७, ८ व प्रतिवादी क्र. २ यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे व योग्य तो हुकूम करण्यात यावा व अर्ज खरा व बरोबर नाही असे नमुद केलेले आहे.

६. दावा प्रलंबित असताना दावा मिळकतीची विक्री झालेली आहे व त्यामुळे त्यांना दावा मिळकत विक्री केली आहे व जे खरेदीदार आहेत त्यांना दाव्यात प्रतिवादी म्हणुन समाविष्ट करणे आवश्यक आहे. ज्यामुळे दाव्याचा निकाल गुणदोषावर होईल व दाव्याची अनेकत्वे टाळता येतील. त्यामुळे अर्ज मंजूर करणे उचित होईल. सबब, खालील आदेश.

## <u>आदेश</u>

१. वादी यांचा निशाणी ७८ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

RAVINDRA BHAGVAN KHAWALE

Digitally signed by RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Date: 2026.02.11 12:50:14 +0500

**दिनांक** – ०४.०२.२०२६

**ठिकाण** – श्रीगोंदा

रविंद्र भ. खवले,

**२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**

**श्रीगोंदा**